# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

क्र. 1314 / शि.वि. दि. 30/11/2013.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथमिक / उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय :– (1) निर्भय बेटी सुरक्षा अभियान तर्फे आयोजित आत्मसुरक्षा महाशिबिरामध्ये प्रशिक्षणाच्या व्दितीय सत्रात उपस्थित राहण्याबाबत.**
**(2) सोमवार दि. 16.12.2013 रोजी रेशिमबाग मैदान** नागपूर **येथे आयोजित विश्वविक्रमी सिकई मार्शल आर्ट च्या सामुहिक प्रदर्शनात विद्यार्थीचा सहभाग घेण्याबाबत आदेश (5 ते त्यावरील वर्ग)**

**संदर्भ :–** 1) मा. शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प., नागपूर यांचे पत्र क्र. 7683 दि. 29.11.2013.
2) मा.महापौर, म.न.पा. नागपूर यांच्या **दि**.30.11.2013 च्या निर्देशान्वये.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, निर्भय बेटी सुरक्षा अभियान समितीतर्फे नागपूर शहर व जिल्हयातील सर्व शाळा, महाविद्यालयातील हजारोच्या संख्येत विद्यार्थीनीना निःशुल्क सिकई मार्शल आर्टचे आधुनिक आत्मसुरक्षेचे प्रशिक्षण देशातील प्रसिध्द **मार्शल** आर्ट प्रशिक्षक सर्वश्री मजहर एस. खान, के.पी. मायकल, जयंत साखरे, डॉ. मोहन धनवंत व त्यांच्या चमूव्दारे देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षण शिबिराचे प्रथम सत्र दि. 24.11.2013 ते 30.11.2013 पर्यत पार पडले. त्यात अनेक शिक्षक/शिक्षिकांनी उत्साहाने प्रशिक्षण घेतले आहे. परंतु काही कारणास्तव काही शारीरीक शिक्षक/शिक्षिका हया प्रशिक्षण शिबिराचा लाभ न घेवू शकल्याने त्यांना **दि**. 5.12.2013 ते 08.12.2013 पर्यत आयोजित व्दितीय सत्रात उपस्थित राहण्याचे व **प्रशिक्षण** घेवून आपआपल्या शाळेतील विद्यार्थीनींना प्रशिक्षण देण्याचे आदेश करण्यात येत आहे. करीता त्यांना वरील तारखे दरम्यान शाळेतून कार्यमुक्त करावे. शारीरीक शिक्षकांच्या सुविधेसाठी त्यांच्याच क्षेत्रात प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. ती स्थळे पुढीलप्रमाणे –

तिरपुडे महाविद्यालय, सदर पोलिस स्टेशनजवळ 2. पी.डब्लू.डी. कॉलेज कामठी रोड, टेकानाका, 3. विश्वनाथबाबा हायस्कूल वाडी, 4. निराला हायस्कूल सी.ए.रोड, गितांजली टॉकीज 5. महिला महाविद्यालय, नंदनवन नागपूर, 6. सरस्वती विद्यालय, न्यु सुभेदार ले–आऊट म्हाळगीनगर रोड, नागपूर

सहभाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थीनींना महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त सिकई मार्शल आर्टचे प्रशस्तीपत्र निबंसुअतर्फे देण्यात येईल.

सोमवार दि. 16 डिसेंबर 2013 रोजी रेशमबाग मैदान, नागपूर येथे **आयोजित** विश्वविक्रमी सिकई मार्शल आर्टचे भव्य प्रदर्शन होणार आहे. करीता जास्तीत जास्त विद्यार्थीनींना प्रशिक्षण देऊन विश्वविक्रमी प्रदर्शनात सहभागी करावे असे आदेश करण्यात आले आहे. तरी आपण आपल्या शाळेतील शारीरीक शिक्षक/शिक्षिका किंवा शारीरीक शिक्षक नसल्यास इच्छुक शिक्षिकेस सदर प्रशिक्षणास उपस्थित राहण्यास्तव कार्यमुक्त करावे. प्रशिक्षणाची वेळ सकाळी 8.00 ते 1.00 वाजेपर्यंत राहील.

शिक्षणाधिकारी,
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1) मा. महापौर, म.न.पा., नागपूर
2) मा. अपर आयुक्त, म.न.पा., नागपूर
3) मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर

शिक्षणाधिकारी,
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

PC:2/D:\Tembhurne sir \ Letter 1.doc